# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:22.10.2025** **वार:बुधवार**

---

1. देशातील किरकोळ विक्री क्षेत्राकडून सणासुदीच्या काळामध्ये साडेपाच लाख कोटींपेक्षा अधिक वस्तू आणि सेवांची विक्रमी उलाढाल
2. जागतिक पातळीवर आव्हानांना सामोरं जाताना, भारत स्थैर्य आणि संवेदनशीलतेचं प्रतिक म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. दीपावलीच्या प्रकाशपर्वामध्ये राज्यात चैतन्याचं वातावरण; पाडव्यानिमित्त आज बाजारपेठांमध्ये उत्साह
4. सानेई ताकाची जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान आणि
5. महिलांच्या विश्वकरंडक क्रिकेटमध्ये दक्षिण आफ्रिका गुणतालिकेत अग्रस्थानी, पाकिस्तान संघ स्पर्धेबाहेर

**किरकोळ विक्री**

भारतातील किरकोळ विक्री क्षेत्रानं यावर्षी नवरात्र ते दिवाळी दरम्यान सणासुदीच्या हंगामातील सर्वाधिक विक्री नोंदवली. यामध्ये अभूतपूर्व 5 लाख 40 हजार कोटी रुपयांच्या वस्तू आणि 65 हजार कोटी रुपयांच्या सेवांच उलाढाल झाली. अखिल भारतीय व्यापारी महासंघानं केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात, याच कालावधीत एकंदर उलाढाल गेल्या वर्षीच्या तुलनेत 25 टक्क्यांनी वाढल्याचं दिसून आलं आहे. प्रामुख्यानं GST दरांमध्ये घट झाल्यामुळं ही वाढ झाली आहे. मिठाई, गृहसजावट, पादत्राणं, तयार कपडे, ग्राहकोपयोगी आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात आल्या आहेत आणि खरेदीचा वेग वाढला आहे.

**पंतप्रधान**

जागतिक पातळीवर अनेक आव्हानं असताना, भारत स्थैर्य आणि संवेदनशीलतेचं प्रतिक म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. दिवाळीनिमित्त त्यांनी काल देशातील नागरिकांना उद्देशून पत्र लिहिलं. नजीकच्या भविष्यात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या या प्रवासात, राष्ट्राप्रती असलेली कर्तव्य पार पाडणं ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**दीपावली**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातील सर्वात महत्त्वाचा लक्ष्मीपूजनाचा सण काल महाराष्ट्रात सर्वत्र उत्साहात पार पडला. घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन झालं. लक्षवेधक रांगोळ्या, आकर्षक रोषणाई आणि आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी, असं चैतन्यमयी वातावरण काल सर्वत्र होतं. लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात काल दुपारी मुहूर्ताचे सौदे पार पडले. त्यावेळी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक, 63 अंकांची वाढ नोंदवत 84 हजार 426 अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी 25 अंकांची वाढ नोंदवत 25 हजार 869 अंकांवर बंद झाला.

**नागरी विमान वाहतूक-उडान**

प्रादेशिक संपर्क योजना म्हणजेच 'उडे देश का आम नागरिक (उडान)' योजनेने नऊ वर्षांत तीन लाख 23 हजार उड्डाणांद्वारे दीड कोटींहून अधिक प्रवाशांना सुविधा दिली आहे. अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. राष्ट्रीय नागरी विमान वाहतूक धोरणांतर्गत 21 ऑक्टोबर 2016 रोजी प्रादेशिक संपर्क योजना-उडान सुरू करण्यात आली. या

योजनेअंतर्गत, 15 हेलिपोर्ट आणि 2 जल विमानतळांसह 93 सेवा नसलेल्या आणि सेवा न मिळालेल्या विमानतळांना जोडणारे 649 मार्ग कार्यान्वित करण्यात आले आहेत. या योजनेच्या 9 व्या वर्धापन दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमाला संबोधित करताना नागरी विमान वाहतूक सचिव समीर कुमार सिन्हा यांनी अधोरेखित केले की उडान हा एक परिवर्तनकारी उपक्रम आहे ज्याचा उद्देश सामान्य नागरिकांना हवाई प्रवास परवडणारा आणि सुलभ बनवणे आहे. एप्रिल 2027 नंतरही विस्तारित उडान आराखड्याद्वारे ही योजना सुरू ठेवण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेची त्यांनी पुष्टी केली, ज्यामध्ये डोंगराळ, ईशान्य आणि आकांक्षी प्रदेशांशी कनेक्टिव्हिटी आणि सुमारे 120 नवीन ठिकाणांचा विकास यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

**<u>जपान-पंतप्रधान</u>**

सानेई ताकाची जपानच्या पहिल्या, महिला पंतप्रधान बनल्या आहेत. जपान संसदेच्या वरिष्ठ सभागृहाने ताकाची यांची पंतप्रधान म्हणून निवड केली आहे. त्यांना 125 मते मिळाली, विजयासाठी आवश्यक असलेल्या साध्या बहुमतापेक्षा त्यांना एक मत अधिक मिळालं आहे. कनिष्ठ सभागृहात त्यांना 237 मतं मिळाली, तिथं 233 मतं आवश्यक असतात. माजी दूरचित्रवाणी निवेदक असलेल्या 64 वर्षीय ताकाची यांनी 1993 मध्ये जपानी राजकारणात प्रवेश केला. 1996 मध्ये जपानच्या सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पक्षात सामील झाल्या आणि माजी जपानी पंतप्रधान शिंजो आबे यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच त्यांनी मंत्रिमंडळात प्रवेश केला. आर्थिक वाढीतील मंदी, वाढत्या किमती आणि येनचं तीव्र अवमूल्यन ही सानेई ताकाची यांच्या सरकारसमोरील काही प्रमुख आव्हानं आहेत.

**<u>नेपाळ पंतप्रधान जनरल निवडणूक</u>**

नेपाळच्या पंतप्रधान सुशीला कार्की यांनी प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत सार्वत्रिक निवडणुकांच्या तयारी आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी काल भेट घेतली. या बैठकीत विसर्जित प्रतिनिधी सभागृहातील अनेक राजकीय पक्षांचे प्रमुख नेते हजर होते. भ्रष्टाचार आणि सोशल मीडियावरील बंदीवरून तरुणांनी सरकारविरुद्ध केलेल्या निदर्शनांनंतर तत्कालीन पंतप्रधान के पी शर्मा ओली यांची हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर 73 वर्षीय कार्की गेल्या महिन्यात नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. बैठकीदरम्यान कार्की यांनी आश्वासन दिलं की अंतरिम सरकार कायद्यानुसार काम करत आहे आणि सरकार तरुणांच्या चळवळीच्या भावनेचं उल्लंघन करणार नाही. निवडणुका होतील आणि भ्रष्टाचाराची चौकशी सुरू आहे, असंही त्या म्हणाल्या.

**<u>बांगलादेश-न्यायाधिकरण</u>**

बांगलादेशमधील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाच्या अभियोजन पथकानं लष्कराला 15 सेवारत अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर न केल्यास त्यांना फरार घोषित केलं जाईल असा इशारा दिला आहे. ICT-BD चे अभियोजक गाजी एमएच तमीम यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. ICT-BD नं यापूर्वी 16 सेवारत लष्करी अधिकारी आणि माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यासह इतर 14 जणांसाठी अटक वॉरंट जारी केलं. अवामी लीगच्या राजवटीत राजकीय असंतुष्टांना जबरदस्तीनं बेपत्ता करण्यात किंवा त्यांचं अपहरण आणि छळ करण्यात सहभागी असल्याचा या अधिकाऱ्यांवर आरोप आहे.

**<u>काबूल-मिशन</u>**

भारत सरकारने काबूलमधील भारतीय तांत्रिक मिशनला तत्काळ अफगाणिस्तानातील भारतीय दूतावासाचा पुन्हा दर्जा दिला आहे. हा निर्णय परस्पर हिताच्या सर्व क्षेत्रात अफगाणिस्तानसोबत द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याचा भारताचा निर्धार अधोरेखित करतो असं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात म्हटले आहे.

**<u>शौर्य पुरस्कार</u>**

केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरसह विविध संरक्षण मोहिमांदरम्यान अतुलनीय शौर्य प्रदर्शित करणाऱ्या संरक्षण कर्मचाऱ्यांना शौर्य पुरस्कार प्रशस्तीपत्र प्रदान करण्याच्या हेतूनं एक अधिसूचना जारी केली आहे. यामध्ये भारतीय वायू दल, भारतीय लष्कर यांमधील कर्मचाऱ्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. यामध्ये कर्नल कोशांक लांबा, लेफ्टनंट कर्नल सुशील बिश्त

यांसारख्या वीर सेनानींचा समावेश आहे. पारंपरिक युद्धनीतीचे प्रदर्शन करणाऱ्या कर्नटा कोशांक लांबा आणि लेफ्टनंट कर्नल सुशील बिश्त यांना वीरचक्र जाहीर करण्यात आलं आहे. तर वायू दलाचे लढाऊ विमानाचे पायलट ग्रुप कॅप्टन रणजीत सिंग सिद्धू, ग्रुप कॅप्टन अनिमेश पटनी यांनाही वीर चक्राने सन्मानित करण्यात येणार आहे.

**<u>नागालँड-संशोधन</u>**

नागालँड विद्यापीठाच्या संशोधकांनी 'सिनापिक ॲसिड' नावाचं नैसर्गिकरित्या उद्भवणारे वनस्पती संयुग मधुमेहामध्ये होणाऱ्या जखमेवरील उपचारांना लक्षणीयरीत्या गती देण्यास सक्षम असल्याचं संशोधन केलं आहे. मधुमेहात होणाऱ्या जखमा हाताळण्यासाठी सुरक्षित, नैसर्गिक आणि प्रभावी उपचार यामुळे मिळू शकतात. मुखावाटे दिल्यास, सिनापिक ॲसिड मधुमेहाच्या जखमेच्या उपचारांना गती देऊ शकते, हे दाखवणारा हा जागतिक स्तरावरचा पहिला अभ्यास आहे. या बहुविद्याशाखीय अभ्यासात नागालँड विद्यापीठ आणि पंजाबच्या लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमधील तज्ज्ञांच्या सहकार्याचा समावेश होता.

**<u>मथुरा-ट्रेन</u>**

आग्रा-दिल्ली मार्गावरील एक मालगाडी काल रात्री रुळावरून घसरल्यामुळे इतर गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला. मथुराच्या जैंत भागात छतीकारा आणि आजई रेल्वे स्थानकांदरम्यान ही दुर्घटना घडली. यामध्ये मालगाडीचे डझनभर डबे रुळावरून घसरले. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, अपघातामुळे काही गाड्यांचे मार्ग वळवण्यात आले आणि रेल्वेमार्गाच्या दुरुस्तीचं काम सुरू आहे.

**<u>बॅडमिंटन-फ्रेंच-ओपन</u>**

भारताचा लक्ष्य सेन फ्रेंच ओपन सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत आयर्लंडच्या नहत गुयेन कडून 7-21, 16-21 अशा गेममध्ये पराभूत झाला. गेल्या आठवड्यात डेन्मार्क ओपनमध्ये सेननं नहतला हरवलं होतं. मात्र, पॅरिसमध्ये स्वतःहून केलेल्या चुका आणि असंगत खेळाच्या परिणामी त्याला पराभव पत्करावा लागला.

**<u>आयसीसी महिला क्रिकेट</u>**

आयसीसी महिला विश्वचषकातील कोलंबो इथं काल झालेल्या राउंड रॉबिन लीग सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं पाकिस्तानचा 150 धावांनी पराभव केला. पावसामुळं सुरुवातीला झालेल्या विलंबानंतर, सामना 40 षटकांपर्यंत कमी करण्यात आला आणि दक्षिण आफ्रिकेनं 9 बाद 312 धावा केल्या. या विजयासह, दक्षिण आफ्रिकेनं गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवलं तर पाकिस्तान संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. दक्षिण आफ्रिकेचे आता सहा सामन्यांत 10 गुण आहेत. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडचे प्रत्येकी 9 गुण असून आज इंदूरमध्ये ते एकमेकांविरुद्ध खेळतील.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.